# चित्रसंवाद : एक विशेष दुस्तर घाट

## चन्द्रशेखर पुरन्दरे

**प्रस्तावना**

माझे वास्तव्य गेली बरीच वर्षे ब्रिटनमध्ये आहे - इंग्लंड-स्कॉटलंड-इंग्लंड. मी तेथे पेन्टिंगला सुरुवात केली. बरीचशी पेंटिंग्स वर्तमान सामाजिक विषयांवर आहेत. त्यांच्यावर लोकांशी चर्चा व्हावी ही माझी अपेक्षा असते. या 'संवादा'तील अडचणी गेल्या दीड दशकात तीव्र होताना दिसत आहेत. त्याची ही नोंद. त्यासाठी संवादाचे एकमेकांशी संलग्न काही पैलू प्रथम पाहू. मग शाब्दिक भाषेचा प्रभुत्ववाद व नंतर चित्रांच्याबाबतची संवादाची मला व्यक्तिशः जाणवलेली प्रायः अशक्यता.

**संवाद**

संवाद द्वैतावर आधारित असतो. सांगणारा आणि ऐकणारा. अगदी स्वगत असले तरी. 'मला काहीतरी म्हणायचे आहे.' ही अभिव्यक्तीची गरज, ती बहुधा प्रत्येकात असते. संवादात पहिला अभिव्यक्ती करतो मग दुसऱ्याची त्यावरची प्रतिक्रिया - ती त्याची अभिव्यक्ती ...परत पहिला...ही साखळी.

या लेखासाठी संवाद म्हणजे व्यावहारिक स्तराच्या वरची वैचारिक, भावनिक देवघेव गृहीत धरली आहे. ती असली तर तो संवाद. आपण किराणा दुकानात गेलो, एक किलो मूग डाळ मागितली, त्याने पैसे सांगितले - तांत्रिकदृष्ट्या हा संवाद असला तरी मला तो अभिप्रेत नाही. जरा निराळे उदाहरण घेऊ - समजा, काल रात्रीचे आकाश मला विलोभनीय वाटले. दुसऱ्या दिवशी मी तुम्हाला भेटलो आणि हे सांगितले. तुम्हीही ते आकाश पाहिले होते आणि तुम्हालाही ते विलोभनीय वाटले होते. पण तुमचे 'विलोभनीय' आणि माझे 'विलोभनीय' निराळे असण्याची शक्यताच जास्त. तुम्हाला गगनचुंबी इमारतीवरचा काळा ढग मेघदूताची आठवण करून देत होता तर मला पांढरा ढग कापसाची. तुम्हाला वाटते - कापसाची आठवण होते म्हणजे या माणसाची कल्पनाशक्ती किती मर्यादित आहे तर मला मेघदूत हे काव्यच माहिती नसल्याने तुम्हाला अभिप्रेत असणारी विलोभनीयता समजू शकत नाही. म्हणजे आपण दोघेही आकाशाच्या विलोभनीयतेविषयी एकमत असलो तरी 'संवाद' होत नाही. ज्याला कापूस दिसतो...जो मेघदूत का काहीतरी तसे म्हणतो...त्याच्याशी काय बोलणार! हे उदाहरण तर ज्यांचे कालच्या आकाशाबाबत 'एकमत' होते त्या दोघांबाबत. याचे कारण म्हणजे दोघांची भाषा एकच असली तरी शब्दांच्या (त्यातही घसरड्या विशेषणांच्या), संकल्पनांच्या संदर्भचौकटी भिन्न असतात.

याला अनेकपटींनी गुणा म्हणजे सार्वजनिक - एकाहून जास्त - संवादाची मुश्किल लक्षात यावी. त्यामुळे मान्यवर वक्त्यांची अनेकांशी एकाच वेळी संवाद साधण्याची हातोटी स्तुत्य होते. त्यातही त्यांचे भाषण जितके संदिग्ध तितके निराळे अर्थ श्रोता काढतो आणि सगळेच माना डोलावतात! या संदिग्धतेची परमसीमा म्हणजे धार्मिक वाङ्मय. त्या मूळ वाङ्मयात अन्वयार्थांच्या स्तोमाने भर घातली आहे. त्यामुळे शब्द-कल्लोळ मात्र वाढतो. भगवंताला/ द्रष्ट्याला/प्रेषिताला असे म्हणायचे आहे का तसे - हे माझ्या आजच्या आवडत्या आदर्शवादावर अवलंबून रहाते. धार्मिक वचनातून ज्याला जो हवा त्याने तो अर्थ काढण्याची मुभा असते. म्हणजे तो कृतक संवाद असतो.

धर्मानंतर समकालीन राजकीय नेतृत्व.  नेतृत्वाचा 'संवाद' म्हणजे लोकांना जे भावते ते ऐकवणे. समाज-परिवर्तन इष्ट दिशेला व्हायचे असेल तर अनंत कटू वक्तव्ये सतत करायला लागतील आणि खरा संवाद सुरु होईल. राजकारण ते टाळते. ही लोकमान्य संवादाची मर्यादा.

तोच प्रकार काही प्रकारच्या ललित लेखनाबाबत. ते जितके दुर्बोध, जितके संदिग्ध तितके मौलिक असा समज रूढ झालेला दिसतो. लिखाण जितके बहुअर्थी तितके 'खोल' ही संकल्पना अभिजनांनी स्वीकारली कारण त्यामागे पहाता आधी धर्माने मग राजकारणाने  संदिग्धता प्रमाण केली. म्हणून ती रूढ झाली. तिथे संवाद काय असतो हे संशयास्पद आहे. त्यामुळे भाषा आज बहुशः व्यावहारिक पातळीवर आली आहे - एक किलो मूग डाळ द्या.

संवादाचा आणखी एक पैलू म्हणजे - आपल्या अस्तित्वाची ग्राह्यता मिळवण्यासाठी मी-खेरीज बाह्य जगाची जरुरी असते. संवाद ती गरज भागवतो. मग तो संवाद निःशब्दही असेल.

**शब्द बापुडे**

आता संवादाच्या संदर्भात शाब्दिक भाषेच्या (माझ्या मते अनर्ह) प्रभुत्वाकडे वळू. विचार म्हटला की तो शाब्दिकच असतो हा पूर्वग्रह. तो रंगांत असू शकतो, संगीतात असू शकतो, शिल्पात असू शकतो, निसर्गात असू शकतो, अनंत अभिव्यक्तींमध्ये ती क्षमता असते. पण या रसग्रहणाला आपण वेळच देत नाही. त्या त्या माध्यमाचा योग्य मान राखत नाही. संगीताच्या मैफिलीला किंवा शिल्प-प्रदर्शनाला कधीमधी चार तास जाणे किंवा निसर्गसान्निध्यात हॉलिडे रिसॉर्टमध्ये वर्षातले चार दिवस काढणे - म्हणजे त्या अनुभवाला मर्यादित करणे. तो अनुभव दैनंदिन रहाटीपासून सुटका इतपतच रहातो.

एका दृष्टीने पहाता वेदकालापासून आजवर आपण शब्द - गोंडस शब्दात संकल्पना - वारेमाप उधळत आलेलो आहोत. माझ्या मते शाब्दिक भाषा संवादाचे साधन म्हणून थकली आहे. 'पर्याय

काय' हा प्रश्न चुकीचा आहे. नवीन मार्ग चोखाळायचा आळस म्हणून शाब्दिक भाषा. तो कदाचित शाब्दिक भाषेच्या प्रभुत्वाचा खुलासाही असावा. भले संवादाची अपूर्तता जाणवत असेल, त्याने अस्वस्थता येत असेल (मग तर गुंतागुंत वाढते - शब्दांपासून सुटका मिळवण्यासाठी नवीन शब्दांचे मिश्रण! त्यांची ताटे घेऊन तद्न्य बसलेच आहेत) पण त्याच माध्यमावरचे अवलंबित्व कमी होत नाही. (शब्द द्वैत माजवतो - रामानुजाचार्य?). दिलासा म्हणजे तरुण पिढी निराळीच भाषा रूढ करत आहे. मोबाइल फोन, सोशल मीडियावर ती आधारित आहे. या नव्या उमलणाऱ्या भाषेचा आणि तांत्रिकदृष्ट्या पारंपारिक पेंटिंग्सचा सांधा जुळवणे, ज्यायोगे संवाद होईल, हा माझा प्रयास आहे.

**माझी सुरुवात**

पारंपरिक शाब्दिक भाषेचा उबग या कारणाने मी चित्रांचा उपक्रम सोळा-सतरा वर्षांपूर्वी सुरु केला. पुढील लिखाण आत्मकेंद्रित वाटले तरी उद्देश या प्रवासातील सामाजिक प्रवाहांचे दर्शन घडावे हा आहे.

अगदी सुरुवातीला नाही पण पहिल्या चार-पाच वर्षांत मी स्वतःला काही गोष्टी स्पष्ट करून घेतल्या - मला या विषयात औपचारिक शिक्षण नको, मला यात पैसा नको, मला कोणत्याही प्रस्थापिताची मान्यता नको - चित्रकलेतील प्रस्थापितांची तर नकोच नको कारण चित्राच्या तांत्रिक बाबी - रंगसंगती, छाया-प्रकाश, परिप्रेक्ष्य...या माझ्या चित्र-प्रकल्पासाठी मला अप्रस्तुत वाटतात. मग यथेच्छसि तथा कुरु! माझी सामाजिक वेदनांवरची चित्रे थेट लोकांपर्यंत जावी असा माझा या उपक्रमामागचा मर्यादित उद्देश. बहुसंख्यांची स्वघोषित (प्रसंगी ईषत् अभिमानी) भूमिका - मला चित्रातले काही कळत नाही- अशी असते. (तीही संस्कृति-रचित आहे व परिवर्तनीय आहे, पण तो मुद्दा निराळा). मी त्यांच्याशीच संवाद साधायला पहातो. या संवादातील दुर्धरता काळानुसार मला कळत आहे.

**अभिव्यक्ती**

लेखक/कलाकारात अभिव्यक्तीची गरज तीव्र असते. ती त्याची ऊर्मी असते. प्रसंगी तो/ती त्याबाबत असहाय असतो/ असते. या अभिव्यक्तीची निकड समाजाला बहुधा कळत नाही , मग प्रोत्साहन देणे दूरच. नंतर संवाद. संवादाला किती महत्त्व द्यायचे हे व्यक्तिनिहाय आहे.म्हणजे समाजाभिमुख व्हायचे का समाजपराङ्मुख हे ज्याचे त्याने ठरवावे. पण चित्रे सामाजिक संदर्भात असल्याने मी समाजाभिमुख रहातो. चित्रे शेकड्यांत आहेत, ती बघणारा तर हवा! तर त्याच्याबरोबर त्या चित्रात मांडलेल्या विषयावर संवाद होईल.

शाब्दिक किंवा अ-शाब्दिक माध्यमातून अभिव्यक्ती वाचक/ प्रेक्षकांपर्यंत पोचवण्याची प्रमुख वाट किंवा अडथळा म्हणजे दलालांखेरीज समाजाशी संवाद होऊ शकत नाही. लेखकाबाबत प्रकाशक दलाल असेल तर चित्रकाराच्याबाबत गॅलरी. बहुतेक दलालांची प्राधान्यता - 'आम्हाला यातून किती पैसे मिळतील / लोकाभिरुची काय आहे/ती अभिरुची बदलण्याचे काम आमचे नाही', इत्यादी. दुसऱ्या शब्दात बाजारात काय विकाऊ आहे. (अशा बहुसंख्य गॅलरीजमध्ये अपवादात्मक अशा स्कॉटलंडमधील दोन-तीन गॅलरीज आणि पुण्यातील 'सुदर्शन' गॅलरी. यांच्याशी माझा हर्षद संबंध आला.) असे अपवाद सोडता एरवी दलाल बाजाराचा प्रतिनिधी असतो तर अस्सल लेखक/ कलाकार निखळ निर्मितीचा. पण त्यात लोकमान्यतेचा लोभ, पैशाची निकड, वर्तमान राजकीय वातावरण ('बहुसंख्यांकांवर टीका करू नका' किंवा 'अल्पसंख्यांकांवर टीका करू नका', मान्य राजकीय संकेत पाळा) अशा गोष्टींनी राजकीय कलाकाराच्या निर्मितीचे स्वरूप बदलण्याची शक्यता असते. दलालांशी त्यांच्या अटींवर संबंध ठेवायला त्या भाग पाडू शकतात. या सगळ्यामुळे इच्छित अभिव्यक्ती आणि प्रत्यक्षात येणारी अभिव्यक्ती निराळ्या होतात. संवादाचे स्वरूप बदलते.

**चित्रे आणि प्रदर्शने**

चित्रांच्या बाबत संवाद आणखीच दुष्कर असतो. एकतर ते लोकप्रिय माध्यम नाही. साधारणतः तो हास्यास्पद/रिकामपणाचा उपक्रम मानला जातो हा माझा निदान भारतातील तरी अनुभव आहे. 'काय करता?' यावर 'चित्रे काढतो' हे उत्तर दिले की समोरचा तुच्छतेचे हसू दाबतो किंवा नजर टाळतो! त्यामुळे त्या उपक्रमाबद्दल उदासीनता हे पुढचे पाऊल असते. (ब्रिटनमध्ये लोक ही प्रतिक्रिया दाखवत नाहीत. पण 'चित्रे विकता का' हा प्रश्न लगेच येतो! तोही मला अवघड!) अगदी एखादी गॅलरी तुमची चित्रे दाखवायला तयार झाली तरी चित्रे दाखवणे हा खर्चिक, शारीरिक श्रमांचा आणि वेळकाढू प्रकार असतो. फ्रेम करून घ्या, चित्रे नीट पॅक करा, वाहतूक करा, पुढे चित्रे नीट हाताळली जात आहेत, भिंतींवर व्यवस्थित लागत आहेत यावर बारीक नजर ठेवा, अनेक गोष्टी. सुरुवातीची माझी चित्रे प्लायवुडवर असत. त्यांना मीच घरी फ्रेम करत असे. एकेक चित्र सात-आठ किलोचे होई. मी स्कॉटलँडमध्ये असताना अशी पाच-सात चित्रे एकावेळी, अशा अनेक वेळा एडिंबराच्या एका गॅलरीपर्यंत नेलेली आहेत. ही तंगडतोड रखडत तुफान थंडी-वाऱ्यात, पावसात, बर्फवृष्टीत दोन-तीन मैल असे. कारण तीच गॅलरी माझ्या चित्रांसारखी मुख्य प्रवाहाबाहेरची चित्रे दाखवत असे. आणि रेल्वे स्टेशनपासून टॅक्सीच मिळत नसे. इंग्लंडला आल्यापासून अंतराने जवळ अशी गॅलरी मला सापडलेली नाही. आहेत त्या चोख व्यापारी गॅलरीज.

सामाजिक चित्रांबाबत एक महत्त्वाचा (दुर्दैवी) भाग म्हणजे मला काय म्हणायचे आहे हे प्रेक्षकांपर्यंत शाब्दिक भाषेच्या मदतीनेच पोचवावे लागते. मग ती प्रत्यक्ष चर्चा असेल, एखाद्या संस्थेत चित्रासोबत लावलेला मजकूर असेल किंवा इंटरनेटवरचे चित्रासोबतचे वर्णन. माझी बरीच चित्रे अशा खुलाशाखेरीज कळणे कठीण असते. बऱ्याच वर्षांपूर्वीच्या माझ्या पुण्यातील प्रदर्शनात मी सुमारे ४० चित्रे लावली होती, साधारणतः माणूस पाच-दहा मिनिटांत राऊंड उरकून बाहेर जायचा. यावरून धडा शिकून मी पुढच्या प्रदर्शनासाठी एक पुस्तिका तयार केली. त्यात काही चित्रांचे खुलासे दिले. यावेळी तितकीच चित्रे होती. पण आता पुस्तिका हातात घेऊन प्रेक्षक आधी चित्र पहायचा, मग पुस्तिकेतील खुलासा वाचायचा, परत चित्र पहायचा. बऱ्याच वेळा मला एखाद्या चित्राविषयी अधिक विचारायचा. हा संवाद. आता प्रदर्शन पहायला माणसाला ४०-५० मिनिटे लागत. मी जर एखाद्या चित्रावर दोन-तीन आठवडे खर्च करतो, तर एका मिनिटांत ते 'हां हां कळले' म्हणून पुढे सरकणे हे मला कोडे असे. पण या प्रयत्नाला आर्थिक मर्यादा पडल्या. इंग्लंडहून चित्रे येथे आणणे परवडेना. त्यात शासकीय अडचणी - कस्टम्स, जकात, चित्रे विकणार का? पैसे परदेशी नेणार का? हजार कटकटी आणि भ्रष्टाचार. प्रत्येक वेळी कुठनं झक मारली आणि ही अवदसा ओढवून घेतली अशी लाचारी. एकदा तर मुंबईच्या विमानतळ कस्टम्सने मी मलाच इंग्लंडहून पाठवलेली चित्रे मला न कळवता लिलावात काढली होती! एकाला तेथे शेवटच्या क्षणी पाठवले म्हणून तो लिलाव वाचला! एकदा जहाजाने जड, मोठी चित्रे पाठवली तर जहाज कोलंबोला अडकले! (नंतर चित्रे मिळालीही पण मनस्ताप आलाच.) हा सगळा खटाटोप संवादासाठी.

**इंटरनेट**

इंटरनेटमुळे चित्रे लोकांपर्यंत पोचवणे सोपे झाले. पण प्रत्यक्ष संवादाची शक्यता दुरावली. तसेच इंटरनेटवर माझ्या एक मीटर बाय पाऊण मीटर चित्राची प्रतिमा काही सेंटिमीटर बाय काही सेंटिमीटर दिसते (मोबाईलवर आणिक लहान). लॅपटॉपच्या स्क्रीनचा कोन बदलला की रंगही बदलतात आणि प्रकाशही. मोबाइलवर बारकावे गायब असतात. हे सहन करायचे एखाद्या संभाव्य प्रेक्षकासाठी. जो प्रतिमा काही सेकंद मात्र पहाणार. म्हणजे चित्राला अजिबात न्याय मिळत नाही. पण निदान कितीजण कोठल्या देशातून ते चित्र पहातात याची नोंद तरी होते. सामान्यतः पन्नासातील एखादा प्रेक्षक त्यावर प्रतिक्रिया देतो, उत्सुकता असेल तर तो/ती मला चित्राचा अर्थ विचारतो/ते. होतो तो संवाद एवढाच. चित्राचा खुलासा चित्राबरोबर देणे बऱ्याचदा आवश्यक असते. उदा. माझे एक चित्र खैरलांजीच्या हिंसक घटनेवर आहे. ते अ-भारतीय प्रेक्षकाला कळण्यासाठी मला जात-व्यवस्था, येथील भू-धारणा सांगायला लागते.

चित्र एखाद्याने प्रत्यक्ष पहाणे, त्यावर तेथे चर्चा हा संवाद. प्रदर्शनांमध्ये हे घडते. पण वर म्हटल्याप्रमाणे ही शक्यता आता संपुष्टात आली आहे. इंटरनेटला शरण जायला पर्याय नाही. त्यात खर्चिक वाटा अनेक असतात, फसवणुकी असतात. ते टाळून कमीतकमी खर्चात जास्त प्रेक्षकांकडे जाणे. त्या व्यापात वेळही बराच जातो आणि बाहेरून काम करून घ्यायचे तर पैसाही. त्याऐवजी मी पेंटिंग करेन! जाहिरातींच्या फंदात मी नाही त्यामुळे लोकांपर्यंत पहुंच कमी होते.

जाताजाता गेल्या दशकातील माझे इंटरनेटवरील प्रेक्षकांचे निरीक्षण सांगतो. सुरुवातीला प्रेक्षकातील निम्म्याहून जास्त अमेरिकन असत. मग पश्चिम युरोपियन. कदाचित तेव्हाच्या त्या देशांच्या जास्तीच्या इंटरनेट उपलब्धतेमुळे. पण त्यांचे चित्राचे आकलन त्यांच्या सांस्कृतिक कोशात रहाते. हळूहळू दक्षिण अमेरिका खंड, पूर्व युरोप, रशिया व मध्यपूर्व येथील लोकांच्या प्रतिक्रिया येऊ लागल्या. त्या माझ्या चित्रामागच्या उद्देशाच्या जवळ असतात. विशेषतः पोलंड, सर्बिया, रशिया. कदाचित भारत आणि ते देश यांच्या समान विकासपायरीने.

**प्रत्यक्ष प्रेक्षक**

समोरच्या चाळीस-पन्नास चित्रांतील कोणाला कोणत्या प्रकारची चित्रे आवडतात यावरून अनोळखी माणसांचाही आर्थिक/सामाजिक स्तर कळतो. तो कयास बहुधा बरोबर असतो! दलित युवा संघटनांसाठी मी पुण्यात व मुंबईत चित्रे दाखवली होती, संवादही झाला. त्यांना आशयावर भर असणारी रोखठोक, स्पष्ट संदेश देणारी , निःसंदिग्ध चित्रे आवडतात. उच्चभ्रू , मध्यमवर्ग, 'बुद्धिजीवी' संदिग्ध, तरल, मृदू रंगसंगतीकडे वळतात. त्यांना आशयात फारसा रस नसतो. किंबहुना आशय युद्ध किंवा अन्याय असा असेल तर ते ती चित्रे टाळतात. चर्चा करणे त्यांना प्रतिष्ठेचे वाटत नाही. आशय आणि मांडणी यातील हा वर्ग-वर्ण भेद. उदा. ओळखीचे एक उच्चशिक्षित श्रीमंत भारतीय दाम्पत्य इंग्लंडमध्ये आहे. ते घरी आले की बायको आवर्जून 'चित्रे दाखव' म्हणते. आणि कधीच प्रतिक्रिया देत नाही. नवऱ्याला एकतर चित्रांतच एकूण इंटरेस्ट नसावा किंवा माझ्या चित्रांत! (कारण मी विकाऊ माल बनवत नाही!) अशा वेळी चित्रे दाखवणे नको होते.

**चित्रे लोकांकडे नेण्याचा प्रयत्न**

लोकांपर्यंत पोचण्याचे आणखी दोन मार्ग मी चाचपले.

चित्रे सामाजिक असल्याने त्यांच्यावर सामाजिक विषयांमध्ये रस असणाऱ्या लोकांबरोबर चर्चा करणे किंवा एखाद्या शाळेत, कॉलेजात त्यावर विद्यार्थ्यांशी संवाद साधणे. त्यातही नमूद

करण्यासारखी गोष्ट म्हणजे ब्रिटनमध्ये सहा-सात वर्षांच्या मुलांच्या वर्गातील कार्यक्रमात मी चित्राचे नाव सांगत नसे. 'चित्रात तुम्हाला काय दिसते ते सांगा' असे विचारत असे. आणि मुले अचूकपणे चित्राच्या मुद्द्यावर येत. ती माझ्या कामाची पावती. तीच चित्रे प्रौढांपुढे सादर करताना निराळा अनुभव येई. कारण प्रत्येकजण त्याचे रंगीबेरंगी झिरझिरीत पडद्यांचे गाठोडे घेऊन आलेला असे आणि त्या पडद्यामागून चित्र बघे! पण एकूण असे संवादाचे आनंददायक प्रसंग विरळा.

दुसरा मार्ग म्हणजे जेथे लोकांची वर्दळ आहे अशा संस्थांना चित्रे दोन-तीन वर्षांसाठी उधार देणे. माझी चित्रे आशय व विषय पहाता एखाद्या व्यक्तीच्या घरी असण्यापेक्षा ती एखाद्या संस्थेत असणे उचित. उदा. सीरिया, तुरुंग, निर्वासित यासारख्या विषयांवरील चित्रे. म्हणून संस्था. त्यांच्याकडून मी एकही पैसा घेत नाही. पदरखर्चाने फ्रेम्स, वाहतूक करतो. (दोन ठिकाणी तर चित्रे मी त्यांच्या भिंतींवरही स्वखर्चाने लावून दिली आहेत.) आशा ही की काही लोक चित्रे पहातील. संस्थेची जबाबदारी चित्रे सुरक्षित राखणे एवढीच.

त्यातही विचित्र अनुभव आलेले आहेत. एखादी संस्था चित्रे मिळाल्यानंतर महिनोंमहिने ती भिंतीवर लावत नाही, ती त्यांच्या एखाद्या अडगळीच्या खोलीत पडून रहातात. मूळ करार दोन-तीन वर्षांचा. त्यात ही दिरंगाई. माझे वास्तव्य इथे नसल्याने सतत पाठपुरावा मला जमत नाही आणि संकोचही वाटतो. या बेपर्वाईत चित्रांच्या काचाही फुटलेल्या आहेत. प्रसंगी चित्रे लोकांना न दिसताच ओळखीच्या इथल्या एखाद्याला दादापुता करून (वेळ, कार , मदतनीस, ड्रायवर पाहिजे) मी कशीबशी परतही आणलेली आहेत.

एकदा एका संस्थेचे शिक्षक त्यांच्या चार विद्यार्थ्यांना घेऊन आले. पस्तीस-चाळीस चित्रे संस्थांच्या निवडीसाठी मी मांडली होती. मुलांनी दोन तास त्यांच्यात चर्चा केली. चित्रे निवडली. मग ही चित्रे मी बाजूला ठेवली. नंतर आलेल्या संस्थांना ती उपलब्ध नाहीत हे स्पष्ट केले. दहा-बारा दिवसांनी माझी इंग्लंडला परत जाण्याची वेळ आली तरी या संस्थेकडून काही खबर नाही. शेवटी त्या शिक्षकांनी सांगितले की चित्रे मी संस्थेला दान म्हणून द्यावीत अशी नियामक मंडळाची अट आहे! वस्तुतः पहिल्याच भेटीत चित्रे उधार असतील हे मी स्पष्ट केले होते. कराराचा मसुदाही दिला होता. या बेजबाबदार वर्तनाने ती चित्रे माझ्याकडे पडून राहिली.

म्हणजे संवाद दूरच, असल्या संस्थांशी संबंध डोकेदुखी मात्र होते. चित्रांची सुरक्षितताही धोक्यात येते. तरी आजमितीला पन्नास चित्रे विविध संस्थांकडे आहेत - IISER, AFMC, पुणे विद्यापीठ वगैरे. त्यातही दहा-बारा कोणत्यातरी स्टोअररूममध्ये पडून आहेत! (ती इंग्लंडला माझ्या घरी पडून राहिली असती!) बाकीची निदान भिंतींवर तरी आहेत. या संस्थांमध्ये ती अज्ञेय कोणीतरी पहातात. याला यश म्हणायचे एवढेच. संवाद शून्य.

**काही अलिकडची चित्रे व प्रतिसाद**

पहिले चित्र - **larger inert** (अचेतन मोठे असते). चित्र शहरी स्थापत्यावर आहे. चेतना असणारे - माणसे, झाड यांच्या तुलनेत इमारत, कुंपणाची भिंत, फुटपाथ, रस्ता या गोष्टी चित्रात खूपच जास्त जागा व्यापतात. हे असंतुलन दाखवणे हा उद्देश. तो काही मी चित्रासोबत सांगितला नाही. एका रशियन स्त्रीने चित्रावर पुढील प्रतिक्रिया दिली - 'मला चित्र आवडले! हा रोजचा शहरी देखावा आहे. इमारती, भिंती, दगड, रस्ते नैसर्गिक सौंदर्यावर मात करू शकत नाहीत..' म्हणजे ही प्रतिक्रिया माझ्या उद्देशाच्या जवळ नाही किंबहुना विरुद्धच आहे. पण संवाद तर झाला. या माध्यमाचे हे वैशिष्ट्य. शाब्दिक भाषेतील हेतुपुरस्सर संदिग्धतेपेक्षा यातील खुलेपणा गुणात्मक निराळा आहे. हा संवाद उत्स्फूर्त असतो.

दुसरे चित्र कालिदासाच्या **विक्रमोर्वशीयम्** या नाटकावर आहे. अशा चित्राला खुलाशाची जरुरी असते. कारण कालिदास माहीत असला (तोही माहीत असेल असे नाही) तरी हे नाटक माहिती असणारा चित्र बघणे दुर्मिळ असतो. खेदाची गोष्ट म्हणजे, ज्यांना चित्र आवडते, त्यांच्यातही पुढची उत्सुकता दिसत नाही. मग पुरूरवा, ऊर्वशी, वरची घुबडे इत्यादी माझे विवरण अधांतरी रहाते. माझ्याकडून मी चित्र ससंदर्भ सादर करतो इतकेच. संवाद होतच नाही. अभिजात जागतिक साहित्यावर आधारित चित्रे बहुधा या अंगाने जातात. अपवाद डोस्टोयव्हस्की, गाब्रिएल गार्सिया मार्क्वेझ.

तिसरे चित्र - **crawl into a pigeon-hole (and call it bliss)** - कोणत्यातरी खुराड्यात जा (आणि त्याला स्वर्ग म्हणा.) माझ्या मते या चित्राचे नाव पुरेसे बोलके आहे. म्हणून मी इंटरनेटवर काही खुलासा दिला नाही. पण त्यावर आलेल्या प्रतिक्रियांना उत्तर म्हणून मला उद्देश स्पष्ट करावा लागला. एकाने इच्छा व्यक्त केली की कोणताही समाज या थराला न येवो. मग मला सांगावे लागले - 'समाज आज या थराला आलेलाच आहे. चित्र त्या वर्तमानावर आधारित आहे. बहुधा कोणताही मध्यमवर्गीय स्वतःची पाठ थोपटत असतो की मी या यशस्वी स्तरावर आलो ते केवळ माझ्या कर्तृत्वावर. वस्तुतः ते ज्या कुटुंबात जन्मले, त्याचे वसतीस्थान, वर्ग, वर्ण वगैरेमुळे त्यांचा व्यवस्थेत सहज प्रवेश झाला आणि ते ओघाबरोबर वहात गेले. यात वैयक्तिक कर्तृत्व ते किती? गुंजभर की तोळाभर? चित्रातले कबुतर पहा - त्याच्या पाठीवर भविष्यातली खुराडी आताच दिसतात.'

दुसऱ्या एकाने माझ्या हेतूशी जवळ येणारी प्रतिक्रिया दिली - तुरुंगासारख्या सुरक्षित सभोवतालात आनंद मानणे ही सामान्य

मानवी वृत्ती आहे.

चौथ्या चित्राचे नाव - **zone grey** - इलाका राखाडी - हे चित्र दोन खोल्यात येणारा प्रकाश दाखवते. त्यात सामाजिक संदेश नाही. मुख्यतः काळ्या-पांढऱ्याचे मिश्रण. हे चित्र बऱ्याच जणांना आवडले. दोन खोल्यात दोन खिडक्यांतून येणारा प्रकाश वेगळा असतो - हे दाखवले आहे याची नोंद एकाने घेतली. सामान्यतः प्रतिक्रियांतील एक प्रतिक्रिया तरी बारकावे टिपते.

याखेरीज एक अगम्य बाब नमूद करतो. कधीकधी एखाद्या प्रेक्षकाची चित्रावरची प्रतिक्रिया वेगळ्याच आयामात असते. तो कोणत्या चित्रावर बोलत आहे याचा संशय यावा! अशा वेळी संवाद कठीण होतो.

**सारांश**

एकूण आढावा घेता एक अंतर्विरोधी वर्तुळ (दुष्टचक्र) लक्षात यावे. चित्र का तर शाब्दिक भाषेपासून दूर जाण्यासाठी. चित्र काढण्याचे दिवसातील काही तास ते शक्य होते. मात्र चित्र पूर्ण झाले की दबा धरून बसलेली भाषा अंगावर येते. आता चित्र इंटरनेटवर लावा, प्रतिक्रियांची वाट बघा, उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा... त्याच्याशी संवाद होईल! चित्रे समाजदर्शन करणारी असल्याने ती समाजाने बघणे तर अपरिहार्य. हा पेच आहे.

त्यात सामाजिक चित्रांकडे पहाण्याची दृष्टी भारतात प्रगल्भ वाटत नाही. ती अजून एकीकडे पौराणिक विषय, निसर्ग - समुद्र किनारे इत्यादीला किंवा अतिशय दुर्बोध abstract ला चित्र मानते. (यातील वर्ग-भेदही लक्षणीय!) रसग्रहणाचा अभाव, चित्रे कोणाच्याच प्राधान्यक्रमावर नसणे, त्यामागे असणाऱ्या श्रमांची जाणीवही नसणे व ती गांभीर्याने न घेतली जाणे हे माझे संवादाच्या प्रयत्नातील निरीक्षण.

वाढत्या सोशल मीडियामुळे लोकांचा attention span कमी झाला आहे असे काही अभ्यास दाखवतात. त्याचेही योगदान असेल. उपभोक्तावादाच्या चिरंतन हव्यासाचा वाढता प्रभाव, एरवीही अतिशय धकाधकीचे (!) व ताण-तणावाचे (!) जीवन यामुळे संवादाच्या शक्यता कमी होत आहेत.

पश्चिमेतील प्रत्यक्ष प्रदर्शनातील अडथळे व येथील उदासीनता लक्षात घेता चित्रे फक्त स्वान्तःसुखाय मानावीत असा माझा आता कल आहे. २००७ साली 'माझी चित्रकला - एक संवाद' असा एक लेख मी लिहिला होता. एक तपानंतर तसे म्हणायला मी आज बिचकतो.

*(आभार : प्रा. विनया क्षीरसागर)*

*चन्द्रशेखर पुरन्दरे, इंग्लंड*
*http://www.art-non-deco.com*
*artnondeco@yahoo.co.uk*

## लेखात उल्लेख असणारी चित्रे

larger inert [अचेतन मोठे असते]



विक्रमोर्वशीयम्



crawl into a pigeon-hole and call it bliss

[[कोणत्यातरी खुराड्यात जा] आणि त्याला स्वर्ग म्हणा.]]



zone grey  [इलाका राखाडी]

